## प्रारंभिक सुचना

क्र.कावि/अका/भुस/ ४१९/२०१६
उपविभागिय अधिकारी तथा भुसंपादन
अधिकारी खामगांव यांचे कार्यालय
दिनांक.:-१९/ ११ / २०१६

भूमिसंपादन , पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना

ज्याअंर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३(३० चा २०१३) च्या कलम ३ च्या खंड (ई) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकिय अधिसुचना, महसुल व वनविभाग क्र.संकीर्ण११/२०१४/प्रक्र.७७/अ-२, दिनांक- १९ जानेवारी २०१५ ( यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसुचना"असा करण्यात आला आहे.) या व्दारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याचा संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपाशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमिन " असा करण्यात आला आहे ) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त " सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये या व्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी , कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्याअनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतूदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ ( यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे ) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागिय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी खामगांव . यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-१

जमिनीचे वर्णन

गांव- शेगाव तालूका- शेगांव जिल्हा - बुलडाणा

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजीत क्षेत्रफळ ( हे.आर) |
|---|---|---|
| १ | 2 | ३ |
| १ | १२१ | ४.६८ |
| २ | १२२ | २.९० |
| ३ | १२३ | २.६४ |
| ४ | १२४ | २.७६ |
| ५ | १२५ | १.२२ |
| | एकुण | १४.२० |

## अनुसूची-२

सार्वजनीक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण

प्रकल्पाचे नांव:-जिगांव प्रकल्प

प्रकल्पकार्याचे वर्णन:- :-जिगांव प्रकल्पा अंतर्गत बुडीत क्षेत्रात जाणा-या मौजे.कालवड ता. शेगांव जि. बुलडाणा गांवाचे पुनर्वसना बाबत

समाजाला मिळणारे लाभ :- या प्रकल्पामुळे शेती करीता पाणि, सार्वजनीक पाणिपुरवठा, ग्रामिण भागातील शेतकरी शेतमजुर यांना रोजगारांच्या संधी.

## अनुसूची-३

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- सदरचा प्रकल्प हा सिंचनाचा अनुशेष दुर करण्यासाठी आवश्यक आहे. सदर प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून त्या शेतक-यांची समत्ती आहे. सदर गांव हे जिगांव प्रकल्पा अंतर्गत बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे. सदर गांवाचे पुनर्वसन आवश्यक आहे.

## अनुसूची-४

सामाजिक परीणाम निर्धारणाचा सारांश:- नवीन भूसंपादन कायदा २०१३ कलम (६) मध्ये अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

## अनुसूची-५

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ) या प्रकल्पामुळे .शेती करीता पाणि, सार्वजनीक पाणिपुरवठा, ग्रामिण भागातील शेतकरी शेतमजुर यांना रोजगारांच्या संधीउपलब्ध होत असल्यामुळे सदर गांव हे जिगांव प्रकल्पा अंतर्गत बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे सदर गांवाचे पुनर्वसनासाठी खाजगी जमिनीच्या भुसंपादनाची आवश्यकता आहे.

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- :- निरंक

क) ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसुचनेचा तपशिल :- निरंक

टिप :- ........................................ :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागिय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक:- १९ /११/२०१६

ठिकाण :- बुलडाणा

जिल्हाधिकारी बुलडाणा